**18th July, 2026**

To,
**Listing Department,**
BSE Limited
P.J. Towers,
Fort, Mumbai 400001.

**Scrip Code : 531137**
**Scrip Id : GEMSI**

**Ref: Regulation 30 and 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.**

**Subject: Submission of Copies of Newspaper Advertisement pertaining to the Postal Ballot Notice dated 13th July, 2026.**

Pursuant to Regulation 30 read with Regulation 47 and Schedule III, Part A of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we hereby enclose copies of the newspaper advertisements published on 18th July, 2026 in the English newspaper (having nationwide circulation) and the Marathi newspaper (having regional circulation), informing the Members, inter alia, about the completion of dispatch of the Company's Postal Ballot Notice dated 13th July, 2026 and other relevant information.

The aforesaid newspaper advertisements are also available on the Company's website at www.gemstoneltd.com.

Kindly take the above information on record.

Thanking You,
**For Gemstone Investments Limited**

SUDHAKAR BHAGAWATLAL GANDHI
Digitally signed by SUDHAKAR BHAGAWATLAL GANDHI
Date: 2026.07.17 14:42:26 +05'30'

**Sudhakar Gandhi**
**Managing Director**
**DIN: 09210342**

मुंबई मित्र
...रोज सकाळी हातात-दिवसभर मनात!
मुंबई
9870695106 9400110276
@dailymumbaimitra
www.mumbaimitra.com


# आर्थिक तोटा भरून काढण्यासाठी एसटीची १३.५६ टक्के भाडेवाढ

■ प्रतिनिधी, मुंबई

आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या राज्य परिवहन (एसटी) महामंडळाला मागील काही महिन्यात ऐतिहासिक तोटा सहन करावा लागला. तोट्याच्या खाईत अडकलेल्या एसटी महामंडळाचा तोटा, आता प्रवाशांच्या खिशातून भरून काढला जाणार आहे. वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर एसटीच्या भाड्यात १३.५६ टक्के वाढ केली आहे. ही भाडेवाढ १८ जुलैपासून लागू झाली. आधीच महागाईमुळे त्रस्त असलेल्या सर्वसामान्य नागरिकांना आता एसटीच्या भाडेवाढीचेही चटके सोसावे लागणार आहेत. तसेच येत्या गणेशोत्सवात गावी जाणाऱ्यांना एसटीच्या भाडेवाढीसाठी अधिक पदरमोड करावी लागणार आहे.

एसटी महामंडळाला एप्रिल, मे, जून महिन्यात मोठा तोटा झाला. जून महिन्यात ९१.१८ कोटी रुपये झाला असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत तोट्यात जवळपास ६० टक्क्यांची वाढ झाली. अनेक नवनवीन प्रयोग करून देखील एसटी महामंडळाची आर्थिक घडी विस्कटलेलीच आहे. त्यामुळे राज्य परिवहन प्राधिकरणाने राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली.

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये करण्यात आलेली वाढ; तसेच वाहनांचे सुटे भाग, टायर आणि देखभाल खर्चात झालेली लक्षणीय वाढ यांचा सर्वंकष विचार करून हा निर्णय घेण्यात आला. या भाडेवाढीच्यामुळे यापूर्वी केलेली साध्या बसची १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द केली आहे, अशी माहिती एसटी महामंडळाने दिली. गणेशोत्सव कालावधीत मुंबई, ठाणे आणि पालघर क्षेत्रातून कोकणातील मूळगावी जाण्यासाठी प्रवासी एसटीला पसंती देतात. तसेच अनेकजण गट आरक्षण करून एसटी आरक्षित करतात. परंतु, आता भाडेवाढ झाल्याने प्रवाशांचा प्रवास महागला आहे. तसेच नियमित प्रवास करणाऱ्या सर्वसामान्यांच्या खिशाला मोठी कात्री बसणार आहे.

| बसचा मार्ग | जुने दर | नवीन दर |
|---|---|---|
| मुंबई-सातारा | ४९८ रु. | ५१५ रु. |
| मुंबई-कोल्हापूर | ७३० रु. | ७५५ रु. |
| मुंबई-नाशिक | ३५५ रु. | ३७० रु. |
| मुंबई-धुळे | ६६४ रु. | ६८५ रु. |
| मुंबई-चिपळूण | ४९८ रु. | ५१५ रु. |
| मुंबई-सोलापूर | ७७५ रु. | ८०० रु. |
| पुणे-कोल्हापूर | ४२१ रु. | ४३५ रु. |
| पुणे-अहिल्यानगर | २३३ रु. | २४० रु. |
| पुणे-संभाजीनगर | ४५४ रु. | ४७० रु. |
| पुणे-सोलापूर | ४६५ रु. | ४८० रु. |
| नाशिक-पुणे | ४१० रु. | ४२५ रु. |



# चेंबूरमध्ये गॅस टँकरचा भीषण स्फोट चालकाचा मृत्यू, तीन कामगार जखमी

■ प्रतिनिधी, मुंबई

वेल्डिंग करत असताना गॅस वाहून नेणाऱ्या टँकरचा भीषण स्फोट झाल्याची घटना शुक्रवारी चेंबूर परिसरात घडली. या दुर्घटनेत टँकर चालकाचा मृत्यू झाला असून वेल्डिंग करणारे तीन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

चेंबूरच्या माहुल गाव आणि गडकरी खाण परिसरात भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम आणि इतर सरकारी आणि खासगी गॅस कंपन्या आहेत. त्यामुळे या परिसरात कायमच टँकरची मोठ्या प्रमाणात ये जा सुरू असते. याच या परिसरात टँकर दुरुस्तीची काही गॅरेजेस आहेत. येथील मुकुंद नगर परिसरात शुक्रवारी दुपारी ४ च्या सुमारास एका रिकाम्या टँकरच्या टाकीला वेल्डिंग करण्यात येत होते. मात्र सदर टँकरमध्ये काही प्रमाणात इंधन होते. परिणामी, टँकर गरम झाला आणि भीषण स्फोट झाला. या स्फोटानंतर परिसरातील अनेक इमारती आणि घरांच्या तावदानाच्या काचा फुटल्या आहेत.



घटनेनंतर तत्काळ आरसीएफ पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी या स्फोटात जखमी झालेल्या चौघांना तत्काळ शीव रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असताना टँकर चालकाचा मृत्यू झाला. तर जखमी झालेल्या तीन कामगारांवर शीव रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून या प्रकरणी आरसीएफ पोलीस अधिक तपास करीत आहेत.

या परिसरात अनेक तेल कंपन्या आहेत. मात्र या कंपन्यांमध्ये येणारे टँकर उभे करण्यासाठी जागाच उपलब्ध नसल्याने दिवस-रात्र दोनशे ते तीनशे टँकर येथील रस्त्यालगतच उभे असतात. काही महिन्यांपूर्वी अशाच प्रकार गॅस सिलेंडर घेऊन जाणाऱ्या एका टँकरचा येथे अपघात झाला होता.

# पीओपी मूर्तीकारांना आणखी किती मुदत द्यायची?

## नैसर्गिक जलस्रोतांतील विसर्जनावरून उच्च न्यायालयाचे खडेबोल

■ प्रतिनिधी, मुंबई

गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही सहा फ ुटांपेक्षा जास्त उंचीच्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तीचे नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जन करण्यास परवानगी देणारे धोरण कायम ठेवल्यास नैसर्गिक जलस्रोतांचे आणखी नुकसान होईल, अशी टिप्पणी उच्च न्यायालयाने गुरुवारी केली. तसेच, पीओपीपासून गणेशमूर्ती घडवणाऱ्या मूर्तीकारांना एक वर्षांची मुदत देण्यात आली होती, असे नमूद करून आणखी मुदत देण्यावरून न्यायालयाने त्यांना फटकारले.



सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींचे कृत्रिम तलावांत विसर्जन बंधनकारक करणाऱ्या न्यायालयाच्या आदेशानंतर सरकारने सहा फुटांवरील मूर्तींचे नैसर्गिक जलस्रोतांतील विसर्जनाबाबत धोरण आखले होते. मात्र, न्यायालयाने हे धोरण केवळ मार्च २०२६ पर्यंतच लागू असल्याचे स्पष्ट केले होते. यातच, नैसर्गिक जलस्रोतांचे नुकसान नको म्हणून पीओपी मूर्तींचे नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जनास केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानेही (सीपीसीबी) मनाई केली आहे. तसेच, सीपीसीबीची मार्गदर्शक तत्त्वे शिफारशी असल्याचा मुद्दा एकाही मूर्तीकार संघटनेने कोणत्याही न्यायालयात उपस्थित केला नाही याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. त्याचप्रमाणे, या सगळ्या पार्श्वभूमीवर मूर्तीकार पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा विचार का करत नाहीत ? असा प्रश्न करून नकळतपणे तुमच्याकडूनही पर्यावरणाचे नुकसान होत आहे, असेही न्यायालयाने सुनावले.

त्यावर, काही सकारात्मक बदल झाले आहेत. त्यामुळे, मूर्तीकारांच्या बाजूनेही विचार व्हावा. पर्यावरणाचे नुकसान होऊ नये ही मूर्तीकारांचीही भूमिका आहे, मात्र, बदल एका रात्रीत होणार नाही. तसेच, गेल्या काही वर्षांपासून सहा फुटांपेक्षा कमी मूर्ती तयार करण्याचे प्रमाण वाढत असल्याने कुठून तरी चांगली सुरुवात झाली आहे, असे मूर्तीकार संघटनेच्या वतीने युक्तिवाद करताना वकील उदय वारूंजीकर यांनी न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला.

आगामी गणेशोत्सवाचा विचार करता आमच्याकडे केवळ ७० दिवस शिल्लक असल्याचेही त्यांनी न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आम्हाला किती दिवस शिल्लक आहेत ते सांगू नका, सरकारचे धोरण मार्च महिन्यात संपुष्टात आले आहे, तुमच्याकडे वर्षभराचा कालावधी होता. त्यामुळे तुम्ही स्वतः पोओपी मूर्ती तयार करणे थांबवले पाहिजे होते, असे न्यायालयाने म्हटले.

# कॉक्रोच जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांचे आझाद मैदानात आंदोलन

■ प्रतिनिधी, मुंबई

शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी विशेषतः नीट पेपरफुटी प्रकरणावरून देशभरात वातावरण पेटले असून दिल्लीत जोरदार आंदोलन सुरू आहे. अशातच ज्येष्ठ पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांची उपोषणामुळे प्रकृती ढासळत असतानाही सरकारने अद्याप ठोस भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे सरकारचा निषेध आणि वांगचुक यांच्या समर्थनार्थ मुंबईतील आझाद मैदानात गुरुवारी तरुणांनी जोरदार आंदोलन केले. सरकारविरोधातील घोषणांनी अवघा परिसर दणाणून गेला होता. आंदोलनाच्या शेवटच्या टप्प्यात मुख्य समितीने सायंकाळी मंत्री गिरीश महाजन यांची भेट घेतली. पुढील तीन ते चार दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घालून देण्याबाबत महाजन यांनी समिती सदस्यांना आश्वस्त केले.



नीट पेपरफुट आणि अन्य स्पर्धा परीक्षेतील अनियमिततेविरोधात दिल्लीतील जंतर मंतरवर कॉक्रोच जनता पार्टीतर्फे आंदोलन सुरू आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सोनम वांगचुक २८ जूनपासून आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत असून त्यांनी उपोषण मागे घ्यावे, अशी विनवणी कॉक्रोच जनता पार्टीच्या समर्थकांकडून केली जात आहे. मात्र, वांगचुक उपोषणाच्या निर्णयावर ठाम आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाकडे केंद्र शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले असून सरकारच्या या भूमिकेविरोधात देशभरात संतापाची लाट उसळत आहे.

दिल्लीतील आंदोलनाचे पडसाद मुंबईतही उमटले असून कॉक्रोच जनता पार्टीतर्फे गुरुवारी आझाद मैदानात आंदोलन करण्यात आले. त्यात शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

# जोगेश्वरीमधून ११ लाखांचा साबण जप्त; एफडीएची कारवाई

■ प्रतिनिधी, मुंबई

अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने मुंबईतील जोगेश्वरी (पश्चिम) येथील मेसर्स जे. के. सोप बाजार येथे १४ जुलै रोजी छापा टाकला. या छाप्यात संबंधित आस्थापनामध्ये विनालेबल साबण विक्रीसाठी ठेवल्याचे आढळले. या कारवाईत अंदाजे १० लाख ९३ हजार ६८२ रुपये किंमतीचा साबण जप्त करण्यात आला असून, साबणाचे दोन नमुने विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत.

जोगेश्वरी पश्चिम येथील पटेल इस्टेट रोड कादर इस्माईल इस्टेटमध्ये असलेल्या मेसर्स जे. के. सोप बाजारवर १४ जुलै रोजी अन्न व औषध विभागाच्या मुंबई पथकाने छापा मारला. या छाप्यामध्ये सोप बाजारमध्ये विनालेबल साबण साठवून विक्रीसाठी ठेवलेला असल्याचे निदर्शनास आले. या जप्त करण्यात आलेल्या साबणांवर बॅच, लॉट क्रमांक, उत्पादन दिनांक, वापरण्याची अंतिम मुदत, उत्पादन परवाना क्रमांक तसेच उत्पादकाचे नाव व पत्ता आदी कायद्याने आवश्यक असलेली माहिती नमूद करण्यात आली नव्हती. अशा प्रकारे आवश्यक सौंदर्य प्रसाधनांची विनालेबल विक्री करणे कायद्याने गुन्हा आहे. या कारवाईत अंदाजे १० लाख ९३ हजार ६८२ रुपये किंमतीचा साबण जप्त करण्यात आला. पुढील तपासासाठी साबणाचे दोन नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. सदर प्रकरणात मेसर्स जे. के. सोप बाजारचे मालक नबी उल्लाह याच्या विरोधात आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात आली.

# पालकांच्या वेदनांची भरपाई पैशांत होऊ शकत नाही, एकुलत्या लेकीला गमावणाऱ्या याचिकाकर्त्याला दिलासा

■ प्रतिनिधी, मुंबई

जवळपास १६ वर्षे कोमात राहिलेल्या एकुलत्या एका मुलीला गमावणाऱ्या पालकांच्या वेदनांची भरपाई पैशांत होऊ शकत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले आणि याचिकाकर्त्या वडिलांना मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाने (मॅक्ट) मंजूर केलेली सात लाख रुपयांच्या भरपाईच्या रक्कमेत ३७ लाखांपर्यंत वाढ केली.

ही घटना अत्यंत दुःखद आणि दुर्दैवी असल्याचे निरीक्षण न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या एकलपीठाने नोंदवले. तसेच, २०१६ मध्ये मुलीच्या आईचे निधन झाले आणि तिच्या पश्चात मुलीची काळजी घेण्याची जबाबदारी एकट्या वडिलांवर येऊन पडली. त्यानंतर, जवळपास १६ वर्षे कोमात राहिलेल्या तरुण आणि एकुलत्या एक मुलीला गमवावे लागले. त्यामुळे, त्यांच्या वेदनांचे मोजमाप पैशांत किंवा कोणत्याही स्वरूपात करता येणार नाही. पालकांसाठी अशा प्रकारची वेदना ही असह्य असल्याचे निरीक्षणही न्यायमूर्ती जैन यांनी न्यायाधिकरणाच्या भरपाईच्या आदेशात बदल करताना नमूद केले.

न्यायाधिकरणाने कुटुंबाचा वैद्यकीय खर्च आणि घरी अंथरुणाला खिळलेल्या रुग्णाची काळजी घेण्याच्या दैनंदिन खर्चाचा पुरेसा विचार केला नाही. लघवीच्या बॅग्ज, कॅथेटर्स, फीडिंग ट्यूब्स, सिरिंज, डायपर्स, परिचारिका, औषधे आणि डॉक्टरांच्या भेटींवरील खर्च अपरिहार्य असल्याचेही न्यायालयाने आदेशात नमूद केले. एखादी व्यक्ती कोमामध्ये असल्यास त्याच्यावर विविध प्रकारचा खर्च करावाच लागतो आणि त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही किंवा हे खर्च झालेच नाहीत, असे म्हणता येणार नाही. उपचार खर्च मागणाऱ्या व्यक्तीने प्रत्येक खर्चाचा तपशीलवार हिशेब ठेवावा आणि त्याला मूळ देयकांचा आधार असावा. अशी अपेक्षा करणे अस्वीकारार्ह आहे. विशेषतः सामाजिक कल्याणाशी संबंधित कायद्यांतर्गत प्रकरणावर विचार करताना हा दावा करणे चुकीचे असल्याचे निरीक्षणही न्यायालयाने विमा कंपनीचा युक्तिवाद फेटाळून लावताना नोंदवले.

कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर, न्यायालयाने जून २००३ पासून कोमात असलेल्या मुलीचा मृत्यू होईपर्यंतच्या कालावधीसाठी कुटुंबाचा दैनंदिन शुश्रूषेचा खर्च ६०० रुपये निश्चित केला आणि त्याच बाबीसाठी ३५ लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर केली. न्यायालयाने वाहतूक, वैद्यकीय खर्च आणि वेदना व शारीरिक मानसिक त्रासांच्या नुकसानभरपाईच्या रकमेतही वाढ केली. विमा कंपनीला ही वाढीव रक्कम सहा टक्के वार्षिक व्याजासह १२ आठवड्यांच्या आत याचिककर्त्याला देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

# भांडुपच्या छत्रपती शिवाजी महाराज तलाव मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य!

## रस्त्यांवरील खड्डे त्वरित बुजवा; गणेश वराडे यांची प्रशासनाकडे मागणी

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई महापालिकेचे खड्डे मुक्त स्वप्न पुन्हा एकदा भंगले असून, रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून करोडो रुपये खर्च करण्यात येत आहे. तरीसुद्धा मुंबई, उपनगरात मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाल्याचे दिसत असल्याने रस्त्यावरील ठिकठिकाणी पडलेले खड्डे त्वरित बुजवण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश वराडे यांनी मुंबई महापालिकेत केली आहे.

मुंबई उपनगरातील महत्वाचे ठिकाण म्हणजे असलेल्या भांडुप विभागातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात चाळण झालेली आहे. तसेच भांडुप पश्चिमेकडील छत्रपती शिवाजी महाराज तलाव मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाल्याने अपघाताच्या घटना घडण्याची दाट शक्यता असल्याने धोकादायक व जीव घेणे खड्डे लवकरात लवकर बुजवण्यात यावेत, अशी मागणी वराडे यांनी मनपाच्या एस विभागाचे सहाय्यक आयुक्तांकडे केली आहे.



मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),

जा.क्र. मनपा/मध्यवर्ती भांडार /५३/२०२६-२७ दि. १६/०७/२०२६

// प्रथम मुदतवाढ //

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मध्यवर्ती भांडार विभागामार्फत जा. क्र. मनपा/मध्यवर्ती भांडार/४२/२०२६-२७, दि. ३०/०६/२०२६ अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेकरीता विविध बोर्ड-बॅनर, होर्डिंग्ज, नेमप्लेट व फलक छपाई करणे कामी फेर-निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. (Tender ID 2026_MBMC_1313169_1)

याव्दारे सदर कामाची निविदा सादर करणे करीता मुदतवाढ देण्यात येत आहे. उपरोक्त निविदा दि.२२/०७/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व प्राप्त निविदा शक्यतो दि. २४/०७/२०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता उघडण्यात येतील.

जा.क्र. मनपा/मावज/ई ९३३९३०२/२०२६-२७
दि.१७/०७/२०२६

सही/-
(कविता बोरकर)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

GEMSTONE INVESTMENTS LIMITED
Registered Office: Unit No. 1212, 12th Floor of Kosha Kommercial Komplex, situated at Podar Road, Malad (East), Mumbai, Maharashtra, 400097
CIN: L65990MH1994PLC081749 Tel.: +91 7208992060
E-mail: gemstoneltd@gmail.com Website: www.gemstoneltd.com

POSTAL BALLOT NOTICE / E-VOTING

Notice is hereby given that pursuant to the provisions of Sections 108 and 110 and other applicable provisions of the Companies Act, 2013 read with the applicable Rules made thereunder, the Company is seeking approval of its Members by way of **Ordinary Resolutions** through Postal Ballot by way of **remote e-voting and/or Physical Postal Ballot Form** in respect of the matters set out in the Postal Ballot Notice dated **13.07.2026**.
The Members are hereby informed that:
1. The Company has completed dispatch of the Postal Ballot Notice to the Members through the permitted mode on **17.07.2026**.
2. The Postal Ballot Notice is available on the Company's website at www.gemstoneltd.com, on the website of **BSE Limited** at **www.bseindia.com**, and **Central Depository Services (India) Limited (CDSL)** at **www.evotingindia.com**.
3. The business as set out in the Postal Ballot Notice may be transacted through **remote e-voting or Physical Postal Ballot Form**.
4. The remote e-voting facility is being provided by **CDSL**. The detailed procedure for remote e-voting is provided in the Postal Ballot Notice.
5. The **Cut-off Date** for determining the eligibility of Members to vote is **10.07.2026**.
6. The remote e-voting period shall commence on **18.07.2026 at 9:00 A.M. (IST)** and end on **16.08.2026 at 5:00 P.M. (IST)**. The remote e-voting module shall be disabled by CDSL immediately thereafter.
7. The results of the Postal Ballot along with the Scrutinizer's Report shall be displayed on the website of the Company and CDSL and shall also be communicated to **BSE Limited** within the prescribed time.

Members are requested to note that in case they have any queries or issues regarding remote e-voting, they may refer to the Frequently Asked Questions (FAQs) and e-voting manual available at **www.evotingindia.com** under the Help section or write an e-mail to **helpdesk.evoting@cdslindia.com** or call the toll-free number **1800 21 09911**.

By Order of the Board of Directors
For Gemstone Investments Limited
Sd/-
Jayesh Ahire
Company Secretary & Compliance Officer

Place: Mumbai
Date: 17.07.2026

